“नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास”

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका


कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३

WEB SITE : http://www.nkgsbsangh.org

E-MAIL : nkgsbs@gmail.com

कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)


।। गुणा वाच्या दोषा वाच्या गुरोरपि।।

मूल्य रु. ५


क्रमांक ४ वर्ष : ३८ जानेवारी-मार्च २०१९


**BOOK PACKET (PERIODICAL)**

**TO,**


**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

# स्नेहसंमेलनाची क्षणचित्रे




श्री. व सौ कसबेकर कार्यकर्त्यांसमवेत



श्री. कसबेकर यांचा सत्कार



डॉ. वाघ यांचा सत्कार



श्री. कसबेकर भाषण करताना




श्री. व सौ. कसबेकर व डॉ. वाघ
पदाधिकाऱ्यांसमवेत

## हळदीकुंकू समारंभ - भगिनींस निमंत्रण

नेहमीचा मकरसंक्रांतीचा हळदीकुंकू समारंभ यंदा माहीम व मुलुंड येथे योजिला आहे. आपण हेच निमंत्रण समजून वेळांत वेळ काढून आपल्या लेकीसुनांसह सोयीस्कर ठिकाणी अवश्य यावे ही विनंती

| | माहीम | मुलुंड |
|---|---|---|
| **तारीख** | मंगळवार १५ जानेवारी २०१९ | मंगळवार १५ जानेवारी २०१९ |
| **कार्यस्थळ** | माटुंगा मित्रमंडळ<br>एफ ४, कर्नाटक बिल्डिंग,<br>मोगल लेन, माहीम. | सौ. स्मिता रेगे यांच्या निवासस्थानी<br>२०४, स्मिता, ११५ डॉ. आंबेडकर रोड,<br>मुलुंड (प). |
| **वेळ** | संध्याकाळी ५ ते ७ | संध्याकाळी ४.३० ते ७.३० |
| | **संघ कार्यकारिणीतर्फे**<br>किशोरी अ. वागळे, सुरेखा सु. पालेकर | **सांस्कृतिक मंचतर्फे**<br>स्मिता दु. रेगे , नीलिमा श. नाडकर्णी |

# संपादकीय

## मुंबई येथील मिनी कारवार जोगेश्वरी येथील सरस्वती बाग शतकाच्या उंबरठ्यावर - एक आवाहन

शंभर वर्षापूर्वी गिरगांव भागात चाळीचाळीतून दाटीदाटीने राहणाऱ्या कांही ज्ञातिबांधवांनी जोगेश्वरी येथील इस्मालिया या गांवात दि. कॉनरा गौड सारस्वत को. ओ. हौ. सोसायटी अशी सहकारी घरबांधणी केली. या वसाहतीचे नांव होते ‘सरस्वती बाग’ पण ती ‘सोसायटी’ या नांवानेच ओळखली जाते. १५ जुलै १९१९ हा स्थापना दिन. योगायोगाने पु. लं. चे जन्मवर्षसुध्दा १९१९ म्हणजे उभयतांचे २०१९ हे शताब्दी वर्ष. पुलंचे आजोबा ‘ऋग्वेदी’ हे सोसायटीच्या आद्य संस्थापकापैकी एक त्यामुळे पुलंचे बालपण आजोळी सोसायटीतच गेले.

शताब्दीच्या निमित्ताने साधारण नोव्हेंबर/डिसेंबर मध्ये स्मरणिकेचे प्रकाशन व सांस्कृतिक कार्यक्रम करण्याचे ठरविले आहे. आपल्या ज्ञातीतील बऱ्याच व्यक्ती सोसायटीत पूर्वी वास्तव्याला होत्या व आता स्थलांतरीत झाले आहेत अशाना व सध्या सोसायटीत राहत असलेल्यांना नम्र विनंती आहे त्यांनी सोसायटीशी निगडीत कांही जुनी छायाचित्रे, दस्तऐवज, आठवणी असल्यास सोसायटीच्या कार्यवाहाकडे पाठविण्याची कृपा करावी. सोसायटीच्या कार्यकारी मंडळावर ज्यांनी पूर्वी कार्य केले असेल त्यांनीही संबंधीत तपशील पाठवावा. काही कारणामुळे संबंधित व्यक्तींना मजकूर पाठविणे शक्य नसल्यास कार्यवाहाशी संपर्क साधावा.

कार्यवाह : सुभाष नीलकंठ वागळे, दी कॅनरा गौड सारस्वत को. ऑ. हौ. सो. लि.

सरस्वती मंदीर, सरस्वती बाग, जोगेश्वरी पूर्व मुंबई – ४०००६०

मोबाईल ९८२०३४५७७१ दूरध्वनी : ०२२-२८२२५१३७

ईमेल : subhashwagle07@gmail.com

द.ना.नाडकर्णी

## विवाहाचा सुवर्णमहोत्सव गाठणाऱ्या जोडप्यांना वार्षिक स्नेहसंमेलनात स्मृतिचिन्हे देण्यात आली त्यांची नावे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| श्रीमती शर्मिला (शरयू) | व | श्री. सदानंद तातोबा आजगांवकर | – | कांदिवली |
| श्रीमती उमा | व | श्री. शंकर सदाशिव बोरकर | – | गोवा |
| श्रीमती स्मिता (दुर्गी) | व | श्री. सत्येन्द्र गोविन्द बोरकर | – | पुणे |
| श्रीमती शैला | व | श्री. पांडुरंग (आपा) गणपत नाडकर्णी | – | पुणे |
| श्रीमती वंदना | व | श्री. जयवंत भवानीशंकर पिकळे | – | कांदिवली |
| श्रीमती छाया | व | श्री. अशोक भवानीशंकर पिकळे | – | विरार |
| डॉ. सुरेखा | व | डॉ. रामदास सुब्राव प्रभु | – | इंग्लंड |
| श्रीमती स्मिता | व | श्री. दुर्गादास शंकर रेगे | – | मुलुंड |
| श्रीमती उमा | व | श्री. हरीहर काशिनाथ वैष्णव | – | शि. पार्क |
| श्रीमती मंगला | व | श्री. महारुद्र वामन वागळे | – | मुलुंड |
| श्रीमती सुवर्णा | व | श्री. पंढरीनाथ वामन वागळे | – | गोरेगांव |
| श्रीमती वैशाली | व | श्री. वामन अनंत वर्टी | – | नाशिक |

## ७५ वर्षे वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींना स्मृतिचिन्हे देण्यात आली त्यांची नावे

| | |
|---|---|
| मारुती विश्वनाथ दळवी | मुलुंड |
| विजयालक्ष्मी वसंत गायतोंडे | अंधेरी |
| शांताराम (अरुण)सदानंद कुलकर्णी | कारवार |
| शर्मिला प्रकाश नाडकर्णी | दादर |
| सुरेश मंगेश पालेकर | ठाणे |
| किरण जगन्नाथ सुखटणकर | ठाणे |
| स्वरुपा गजानन तेलंग | पुणे |
| डॉ. सुहास पांडुरंग वाघ | माहीम |
| मंगला महारुद्र वागळे | मुलुंड |
| राजाराम नीलकंठ वागळे | जोगेश्वरी |
| गोविंद(अरुण) भवानी वर्टी | बोरीवली |
| विजय भालचंद्र पालेकर | मुलुंड |
| मनीषा माधव कसबेकर | माहीम |
| दत्तात्रय मंगेश मुझुमदार | कांदिवली |
| उषा निशिकांत नाडकर्णी | अंधेरी |
| गोपालकृष्ण(प्रकाश)आंनद फेणे | जोगेश्वरी |
| सुरेश दत्तात्रय तेलंग | अंकोला |
| विठ्ठल (गजा) महाबळेश्वर वाघ | गिरगांव |
| जयवंत कृष्णराव वाघ | मुलुंड |
| रजनीकांत श्रीनिवास वागळे | भांडुप |
| शुभदा सतीशचंद्र वागळे | पारले |
| वामन अनंत वर्टी | नाशिक |

# प्रकाशझोत

## पद्मभूषण डॉ. पद्माकर दुभाषी यांना आणखी एक पुरस्कार

पॉल एच्. ॲपल्बी हे प्रशासकीय व्यवस्थापनाच्या कार्यप्रणालीमध्ये तज्ज्ञ होते. भारत सरकारने त्यांच्या अनुभवाचा फायदा घेऊन त्यांच्याकडून कांही मार्गदर्शक तत्त्वांचा अहवाल तयार केला. त्याशिवाय त्यांनी इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन ही संस्था स्थापन केली. ॲपल्बी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ सरकारतर्फे प्रतिवर्षी कुशल व्यवस्थापकांना त्यांच्या नांवे पुरस्कार दिला जातो. २०१८ सालचा सदर पुरस्कार ८८ वर्षीय पद्मभूषण पुणे येथील डॉ. पद्माकर रामचंद्र दुभाषी यांना त्यांच्या प्रशासन क्षेत्रांतील उत्लेखनीय योगदानाबद्दल देण्यांत आला. नवी दिल्ली येथे भरलेल्या एका खास समारंभात प्रतिष्ठित मान्यवरांच्या उपस्थितीत उपराष्ट्रपती डॉ. वेंकय्या नायडू यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यांत आला. डॉ. दुभाषी स्वत: १९८१–८६ दरम्यान सदर इंस्टीट्यूटचे पाच वर्षे संचालक होते. २०१० साली प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला त्यांना 'पद्मभूषण' हा पुरस्कार मिळाला होता.

## निष्णात मानसोपचार तज्ज्ञ डॉ. राजेश नाडकर्णी यांची न्यू कॅसल येथील प्रख्यात हॉस्पिटलमध्ये कार्यकारी मेडीकल डायेरक्टर म्हणून नियुक्ती.

गेल्या पिढींतील दादर येथील आपल्या एज्युकेशन सोसायटीच्या कार्यकारिणीचे एक सभासद श्री. दत्तोबा नाडकर्णी, मल्लापूरकर यांचा नातू व माहीम येथील सौ. राधा व श्री. पांडुरंग नाडकर्णी यांचा सुपुत्र डॉ. राजेश नाडकर्णी यांने के. ई. एम्. हॉस्पिटलशी संलग्न असलेल्या जी. एस्. मेडिकल कॉलेजमधून MBBS ही पदवी प्राप्त केली. नंतर तो नायर हॉस्पिटलमधून मानसोपचार शाखेत MD परीक्षा उतीर्ण झाला. त्याच विषयांत विशेष प्रावीण्य मिळविण्यासाठी त्याने DNB ही केले. उच्च शिक्षणासाठी त्याने इंग्लंडमध्ये प्रयाण केले व MRCP ही उत्युच्च पदवी मिळविली व तेथील हॉस्पिटलमध्ये काम केले. या क्षेत्रातील त्याच्या दांडग्या अनुभवामुळे न्यू कॅसल येथील एका प्रख्यात हॉस्पिटलमध्ये कार्यकारी मेडीकल डायरेक्टर म्हणून त्याची नियुक्ती करण्यांत आली. इंग्लंडमध्ये वैद्यकीय क्षेत्रांत ही एक प्रतिष्ठेची नेमणूक असे समजण्यांत येते. राजेशच्या यशाबद्दल हार्दिक अभिनंदन.

## फिजिओथेरापिस्ट डॉ. किशोर बोरकर याला डॉक्टरेट.

जोगेश्वरी येथे राहणारे डॉ. शिवानंद (शेखर) अंबिकाचरण बोरकर यांना पन्नाशीनंतर 'फार्मासुटिक्स' या विषयांत पी. एच्. डी. पदवी मिळाली होती. त्यांचा मुलगा डॉ. किशोर बोरकर पेशाने फिजिओथेरापिस्ट आहे. त्याला सुध्दा अलीकडेच पर्यायी औषधे या विषयावर पी. एच्. डी मिळाली आहे.

## मुंबई मंच - कारवारी मेळाव्याचे निमंत्रण

**'कारवारी खाद्यमेळाव्याला'** दरवर्षी मिळणाऱ्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे स्फूर्ती घेऊन यंदाही एक 'आनंद मेळावा' भरविण्यात येत आहे. पाककृतीशिवाय ज्यांना आपण बनविलेल्या वस्तू किंवा पदार्थ विक्रीसाठी किंवा प्रदर्शनासाठी ठेवायचे असतील, व ज्यांना बालगोपाळासाठी करमणुकीचे खेळ आयोजित करावयाचे असतील त्यांनाही गाळा मिळेल. इच्छुकांनी त्वरीत संपर्क साधावा. सर्वांनी सहकुटुंब मेळाव्याला उपस्थित राहावे.

**तारीख व समय** : रविवार २७ जानेवारी २०१९ सायं. ५.०० ते ९.००

**कार्यस्थळ** : सरस्वती बाग, जोगेश्वरी, के. जी. एस. सोसायटी पटांगण

**आकार** : रु. ८०० एका गाळयासाठी

**संपर्क** : गाळा आरक्षणासाठी व पाककृती ठरविण्यासाठी (रात्री ७ ते १०)

**रसिका गायतोंडे : ९९६७४३४४०१ राजू बोरकर ९८२०९१७८४१**

**संपर्कासाठी अंतिम तारीख : १५ जानेवारी २०१९**

## ठाणे मंच आयोजित 'सुरभी'

**(विविध गाण्यांची धुंद मैफल)**

**पुणेकरांच्या खास आग्रहास्तव 'सुरभी' ही विविध गाण्यांची मैफल आयोजित केली आहे.**

दिनांक : रविवार १३ जानेवारी २०१९

समय : संध्याकाळी ४.३० ते ७.३०

स्थळ : बेडेकर गणपती हॉल, ऑफ पौड रोड. एम्. आय.टी. कॉलेज जवळ पुणे.

- समस्त पुणेकर कारवारी ज्ञातिबांधवांना एकत्र येण्याची उत्तम संधी. सर्वांनी सहकुटुंब सहपरिवार यावे ही विनंती.

**संपर्क**

| सुरेश पालेकर | उमेश तेलंग, पुणे | राजेश दिवेकर |
|---|---|---|
| ९९६९४५५३७० | ८०८७३५३२७० | ९६१९३६२४६० |

# ज्ञातीचे वार्षिक स्नेहसंमेलन २०१८ चे प्रमुख पाहुणे श्री. अरुण भास्कर कसबेकर यांनी केलेल्या कोंकणी भाषणाचा स्वैर मराठी अनुवाद

नमस्कार ! माझ्या सर्व ज्ञातिबांधवांना माझा प्रेमपूर्वक नमस्कार. संघाचे चेअरमन श्री. मारुती दळवी यांचा मला या वर्षीच्या स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे म्हणून नियुक्त केले आहे – असा जेव्हा फोन आला तेव्हा मला खूपच नवल वाटले. कारण माझ्यापेक्षा कितीतरी पटींनी कर्तृत्ववान तसेच यशस्वी, आपले ज्ञातिबांधव आहेत. पण हे सर्व विचार दळवींसमोर मांडण्या आधीच आणखीन एक विचार मनात आला आणि तो म्हणजे आपल्या ज्ञातीतल्या काही चालीरितींबद्दल गेली २०–२५ वर्षे मला खूपच मनस्ताप झाला आहे आणि अजूनही होत आहे. या चालीरिती सद्ययुगांत किती योग्यअयोग्य आहेत, माझे कुठे चुकत आहे, हे समजून घेण्यासाठी हे 'व्यासपीठ' मला मिळालेली एक अपूर्व संधी आहे व ती मी दवडता कामा नये असे समजून, काहीही न बोलता मी त्यांचे निमंत्रण स्वीकारले आणि आज मी तुमच्यासमोर उपस्थित आहे. माझ्या मन:स्तापाची जी कारणे आहेत ती मी तुमच्यासमारे मांडणार आहे व यावर समाधानकारक उपाय/तोडगा तुम्ही सुचवाल अशी मी अपेक्षा करतो.

**१) परदेशगमनानंतर कुलदेवतांच्या पूजेसाठी प्रायश्चित्त घेणे खरोखरच आवश्यक आहे का ?**

मी Orbit Travels या कंपनीचा जवळजवळ पाच वर्षे डायरेक्टर होतो. ही कंपनी जगांत जेथे जेथे महत्त्वाची Trade fairs / Industrial Exhibitions होतात तेथे तेथे भारतातून ग्रुप्स घेऊन जायची. डायरेक्टर म्हणून माझे काम ग्रुप करिता हॉटेल बुकींग करणे असायचे व त्या निमित्ताने महिन्यातून कमीत कमी ३ वेळा तरी युरोप, अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया वगैरे परदेशगमन करावे लागत असे. तसेच Orbit Travels परदेशातील ग्रुप्स्ना भारत दर्शन घडवून आणायचे. या भारतदर्शनात गोवादर्शन हे एक फार मोठे आकर्षण ! मी खास करुन या गोव्याच्या सफरीला ग्रुप बरोबर असे. मला गोव्याचे आकर्षण मुख्यत्वे मंदिरात देवीचे दर्शन घेणे व अभिषेक कुंकुमार्चन पूजा करणे. पण प्रत्येक खेपेला मला प्रायश्चित्त घ्यावे लागे. मी विचार करीत होतो की मी असे काय पाप केले आहे की मला हे प्रायश्चित्त दरवेळी घ्यावे लागते. पूर्वी या परदेश प्रवासांना काही महिने लागायचे आता काही तासांतच प्रवास पूर्ण होतो. कुठल्याही प्रकारे खाण्यापिण्यांत, आचरणांत भारतात आणि परदेशात काही फरक पडत नसताना हे प्रायश्चित्त कशासाठी ? काहीजण म्हणतील ही प्रायश्चित्त घेण्याची प्रथा आपल्या धर्मात सांगितली आहे आणि ती पाळणे आपले कर्तव्य आहे. पण नवरा मेल्यावर, बायकोने सती जाण्याची सुद्धा

आपल्या हिंदू धर्मात प्रथा होती ती बंद झाली आणि हे अतिशय योग्य झाले असे अखिल कट्टर हिंदू धर्मीयांचे सुद्धा मत आहे. आपल्या गोव्यामध्ये खूपश्या ख्रिश्चन लोकांच्या घरात अजूनही गणपतीचा फोटो आढळतो. कारण त्यांत बाटलेले आपले ज्ञातिबांधव सुध्दा आहेत. त्यांच्या घराच्या कौलांवर शिजवलेला भात टाकला किंवा विहिरीत पाव टाकला तर त्या घरांत राहणारी सर्व माणसे तसेच त्या विहिरीचे पाणी प्यायलेल्या सर्व माणसांना ख्रिश्चन धर्म स्वीकारावा लागे. त्यांच्यावर कोणी जबरदस्ती केली? आपणच त्याला जबाबदार आहोत. आपणच त्यांना जबरदस्तीने वाळीत टाकले. आज आपली सकाळच, पावाच्या न्याहरी पासून सुरु होते. मला खात्री आहे की, कट्टर सनातनवादी सुध्दा या प्रथेला आज विरोध करेल. तेंव्हा माझे असे स्पष्ट मत आहे की ही परदेशगमनानंतर प्रायश्चित्ताची प्रथा सुद्धा मोडीत काढणे आवश्यक आहे. तुम्ही काही उपाय सुचवाल काय?

**२) आपल्या ज्ञातीत होणारे आणि झालेले आंतर्विवाह आणि त्यांना कुलदेवतांच्या गाभाऱ्यात उभयतांना एकत्रित पूजेसाठी प्रवेश निषिद्ध.**

ऑक्टोबर-डिसेंबर २०१८ च्या मुखपत्रिकेत माझ्या लेखांत मी माझा मुलगा- अतुलबद्दल बरेच काही लिहिले आहे. 1st year B.Chem मध्ये मेरीट लिस्टमध्ये येऊन सुद्धा त्याच्या मनांत केमिकल इंजिनिअरींग सोडून B.A. करावयाचे होते आणि ते फक्त देवीने त्यांच्या बाजूने कौल दिल्यानेच शक्य झाले. इतकेच नाही तर त्याची भरभराटही झाली. तेव्हांपासून अतुलची देवीवर खूपच श्रद्धा. त्याच्या घरांत एका खोलीत देवीची स्थापना केली आहे. रोज देवीसमोर दिवाबत्ती केली जाते. पण लग्न झाल्यावर बायकोला घेऊन तो मोठ्या उत्साहाने देवीदर्शनाकरिता गोव्याला गेला पण त्याला गाभाऱ्यांत उभयतांना पूजा करायला दिली नाही. कारण त्याची बायको CKP जातीची. आमची सून अतिशय सालस स्वभावाची, शांत, सुगरण, 1st Class इकॉनॉमिक्स पदवीधर. अतुलचे ऑफीस तसेच घर चांगल्याप्रकारे सांभाळणारी. आमच्याशी अदबीने वागणारी. थोडक्यात, आम्ही तिला सून नाही तर आपची चौथी कन्याच समजतो. नाईलाजाने अतुल बायकोला घेऊन हिरमुसलेल्या चेहऱ्याने मुंबईला परत आला. अतुलने त्या प्रसंगानंतर देवळांत परत पाय ठेवला नाही. त्याच्या मुलांना सुद्धा देवळाच्या गाभाऱ्यांत प्रवेश नाही हे कळल्यावर तर परत कधी देवळांत जाण्याचा प्रसंगच आला नाही. अतुलची दोन्ही मुले अभ्यासांत अतिशय हुशार आणि दोघेही अमेरिकेत शिकत आहेत. पण त्यांनी अजूनही कवळ्याचे आपले देवीमंदीर पाहिले नाही. पण अतुलची देवीवरील श्रद्धा कमी झाली नाही. रोज दिवाबत्ती, उपासना त्याची चालूच आहे. तो दानही खूप करतो पण चुकूनसुद्धा आपल्या देवळाकरिता किंवा मठाकरिता एक पैसा देत नाही. आता त्याला आणि त्याच्या कुटुंबीयांना या प्रथेबद्दल जरा सुद्धा खंत नाही. देवीकृपेसाठी देवळांत जाणे आवश्यक आहे असे

त्यांना अजिबात वाटत नाही, पण आम्हालाच खूप वाईट वाटते. असे वाटते की ही माझी शेवटची पिढी. आम्हा दोघांनंतर माझ्या कुठल्याही वारसाला कवळ्यांत देवीमंदीरातील गाभाऱ्यात प्रवेश नाही. कुठेतरी काही चुकते आहे असे वाटते. जसे परदेशगमनानंतर प्रायश्चित्त घ्यावे लागते तसे काही प्रायश्चित्त घेऊन आमच्या सुनेला तसेच नातवंडांना देवळाच्या गाभाऱ्यात प्रवेश मिळू शकत नाही का ? तुम्हीच काही उपाय सुचवा!

**३) माझा मित्र जो देवीचा अनन्य भक्त, निर्व्यसनी, दानशूर आणि शुद्ध शाकाहारी, त्याला अग्रशाळेत त्याच्या नावाने प्रवेश नाही पण व्यसनी, मांसाहारी, सगळे थेर करायला आपल्या महाजनांना मात्र प्रवेश!**

माझा एक गेली ५५ वर्षे दोस्ती असलेला एक मित्र आहे. ५० वर्षापूर्वी तो खूप वाईट परिस्थितीत सापडला होता. घरचा श्रीमंत असूनसुद्धा हलाखीचे जीवन जगत होता. त्याच्यासमोर बरेच प्रश्न होते पण उत्तर सापडत नव्हते. त्याला मी कवळ्याला जाऊन आपल्या देवीचा सल्ला घ्यायला सांगितले. त्याने त्याप्रमाणे देवीचा कौल घेतला व देवीने सांगितल्याप्रमाणे कार्यपद्धती आकारली आणि त्याची भरभराट झाली. तेव्हांपासून त्याची आपल्या देवीवर खूपच श्रद्धा. त्याच्या मुंबईतल्या आलिशान घरातल्या एका खोलीत फक्त देवीचाच फोटो खूप आकर्षकरीत्या सजविलेला दिसेल. त्याने आपल्या कवळे मठासाठी व देवीसाठी भरपूर दान केले आहे. तीस चाळीस लाखाच्यावर असेल. प्रत्येक महापंचमीला हा गृहस्थ देवळांत असतो. त्याने 'साकारलेल्या' नवचंडी, शतचंडी, मला खात्री आहे, गेल्या ४५० वर्षामध्ये कोणत्याही महाजनाने आपल्या मंदिरात साकारलेल्या नसतील. आपले स्वामीसुद्धा त्याला चांगले ओळखतात. एखाद्या महापंचमीला जर माझा मित्र दिसला नाही तर पुढच्या भेटीच्यावेळी विचारतात – तुझी देवीवरील श्रद्धा कमी झाली काय ? गेल्या पंचमीला तू दिसला नाहीस! वगैरे!! पण या देवीभक्ताला त्याच्या नावाने अग्रशाळेत जागा मिळत नाही. रुम्स रिकाम्या असल्यातरी! त्याला हॉटेलमध्ये रहावे लागते. पण काही कारणानिमित्त मठाकरिता, देवस्थानाकरिता वर्गणी गोळा करावयाची असली तर या माझ्या मित्राचे नाव यादीमध्ये खूपच वर असते.

आणखी एक गोष्ट तुम्हांला सांगायची आहे आणि ती म्हणजे, तुम्हा बहुतेकांना माहितच आहे, आपले बरेच ज्ञातिबांधव अग्रशाळेत धुम्रपान, सुरापान सर्रास करतात. इतकेच नव्हे तर बाहेरुन चिकन, मटन मागवून त्याचा आस्वादही घेतात. अग्रशाळेत हॉटेलपेक्षा भाडे खूपच कमी म्हणून गोवा सफरीत, अग्रशाळेत तीन–चार दिवस राहणारे सुद्धा बरेच महाभाग आहेत. सी–बीचवर हुंदडणे व बाहेरचे सगळे उपद्व्याप करण्यापुढे, त्यांच्या चार दिवसांच्या मुक्कामात, देवळांत डोकावून बघण्यासाठी सुद्धा त्यांना वेळ मिळत नाही. देवळात प्रवेश करणे

तर दूरच राहिले तरीसुद्धा त्यांना हक्काने जागा मिळते पण माझ्या निर्व्यसनी, शुद्ध शाकाहारी, दानशूर, देवीच्या परमभक्ताला अग्रशाळेत जागा नाही. तुम्हाला हे कितपत योग्य वाटते ते बघा व एखादा उपाय सुचवा.

या माझ्या मित्राने माझ्याशी या गोष्टींबद्दल जरा सुद्धा वाच्यता केली नाही. तो आपल्या देवीभक्तीत पूर्णपणे मग्न असतो. हे सर्व माझेच निरीक्षण आहे. जरी मी त्याचे नाव लिहिले नाही तरी त्याला जर हे मी लिहिलेले कळले तर तो निश्चितच माझ्यावर नाराज होईल.

मला खात्री आहे, आपले काही ज्ञातिबांधव जरुर असे म्हणतील की अग्रशाळा ही आपल्या महाजनांची खाजगी वास्तु आहे आणि त्याचे पावित्र्य इतरांनी येऊन भ्रष्ट करू नये. पण आपल्या काही व्यसनी, बेजबाबदार महाजनांनी कसलेही प्रताप केल्यास त्यांना हे क्षम्य आहे.

यावर मला शिवाजीमहाराजांची एक गोष्ट आठवते–त्यांचे कुलदैवत श्रीभवानीमातेच्या एका पालखी मिरवणुकीत महाराज स्वतः सामील झाले होते. गावांतून पालखी नेताना महाराजांना दूर एका कोपऱ्यात ५–६ जण अगदी भक्तीभावाने देवीमातेला वंदन करताना दिसले. महाराजांनी त्यांना जवळ बोलाविले आणि पालखीस खांदा देण्यास सांगितले. तेव्हा जवळ असलेले पुजारी म्हणाले– महाराज असे करू नका ! महापातक होईल ! ही हीन जातीची माणसे आहेत. असे ऐकताच महाराज म्हणाले–हे देऊळ बांधण्यास कुणी परिश्रम घेतले ? देवीच्या गाभाऱ्याच्या विटा कोणी बनविल्या आणि बसविल्या ? देवीची मुर्ती कोणी तयार केली ? हे सर्वत्र कोरीव काम कोणी केले ? ह्या स्वतंत्र हिंदवी स्वराज्याची स्थापना कोणाच्या बलिदानाने आणि सहकार्याने शक्य झाली ? आणि हे लोक पालखीला खांदा देऊ शकत नाहीत ?

**४) २०१९ चा आमचा संकल्प पण त्या आधी एक अनुभव :**

मी जेव्हा IISCO मध्ये Sales Executive म्हणून नोकरीला होतो तेव्हां माझ्याकडे बहुतेक गुजराती, मारवाडी, पंजाबी, सिंधी लोकच यायचे. चुकुन जर कोणी मराठीत बोलला तर मी माझ्याकडे असलेल्या मालाने त्याची मागणी शक्यतो पूर्ण करीत असे व जर कोणी कोकणीत बोलला किंवा तो माझा ज्ञातिबांधव आहे असे आढळले तर माझ्याकडचा माल मी देतच असे पण इतकेच नाही HSL, TISCO, मध्ये जे माझे मित्र होते त्यांना सांगून त्यांची इतर मागणीही पूर्ण करीत असे. बालमोहनचे सर्वेसर्वा श्री. दादासाहेब रेगे HSL TISCO, सबंध Iron Market मध्ये धक्के खाऊन माझ्याकडे आले आणि फक्त त्यांचे 'रेगे' नाव बघून, या माझ्या ज्ञातिबांधवाची १००% मागणी मी माझ्याकडून तसेच HSL, TISCO मधून पूर्ण केली. त्यांचा या गोष्टीवर विश्वासच बसला नाही. त्यांनी मला एकदा सहज शाळा पहायला

म्हणून बालमोहन मध्ये बोलाविले आणि मला पूर्वसूचना न देता माझा अचानक मोठा सत्कारही केला. याउलट आणखीन एक अनुभव सांगतो. एक आपले ज्ञातिबांधव–त्यांना गोरेगांवला फॅक्टरी बांधायची होती. स्टीलचा खूपच तुटवडा होता. पण फक्त ज्ञातिबांधव म्हणून मी त्यांना भरपूर माल माझ्याकडून तसेच HSL, TISCO मधून दिला पण या गृहस्थाने खूपसा माल ब्लॅकमध्ये मार्केटमध्ये विकला आणि स्वत:ची फॅक्टरी जवळजवळ फुकट करुन घेतली.

आता महत्त्वाचा मुद्दा म्हणजे या माझ्या ज्ञातिबांधवाच्या घरचे लग्न होते व आम्ही दोघे लग्नाला गेलो होतो. या गृहस्थाने आमची ओळख त्यांच्या व्याह्यांशी अशी करुन दिली.–‘हे आमचे कसबेकर साहेब! रोज लोक त्यांच्याकडे येतात आणि त्यांच्या पायावर पैसे ओततात’. मला काय बोलावे हेच सुचेना. तरी जरासुध्दा वेळ न दवडता मी त्या ज्ञातिबांधवाला त्याच्या व्याह्यांसमोरच विचारले की – ‘माफ करा! तुम्ही माझ्याकडे बऱ्याच वेळा आलात! कृपा करुन आठवून सांगा की तुम्ही मला कधी एक कप चहा तरी दिला आहे का? उलट मीच तुम्हाला दरवेळी चहा बिस्कीटे देत आलो आहे, इतकेच नव्हे तर तुम्हाला विश्वासाने दिलेला माल तुम्ही ब्लॅकने मार्केटमध्ये विकलात आणि स्वत:ची फॅक्टरी फुकट करुन घेतली. ज्या डीलरने जो माल तुमच्याकडून घेतला होता त्याच्याकडूनच नंतर मला तुमचे हे सर्व थेर समजले. मी तुमच्याविरुद्ध Iron and Steel Control Order प्रमाणे सहज कारवाई करु शकलो असतो व ती कारवाई तुम्हाला खूपच भारी पडली असती. पण केवळ ज्ञातिबंधू म्हणून व आपल्याच ज्ञातीची बदनामी होईल म्हणून गप्प बसलो. मी हे सर्व तुम्हाला आधी सांगितले नाही कारण सगळी तुमची कर्मे तुम्ही करुन मोकळे झाला होता तुम्हाला सांगण्यात काहीच अर्थ नव्हता, फक्त तुम्हाला आणि नंतरला वाईट वाटले असते म्हणून बोललो नाही. आता बोलतोय. आणि तुम्ही माझी अशी ओळख करुन देता – तुमच्या व्याह्यांचा माझ्या बाबतीत काय समज होईल?’ हे सांगण्याचा माझा फक्त एकच उद्देश आहे आणि तो म्हणजे आपल्या ज्ञातिबांधवात असेही लोक आहेत. तो अरुण कसबेकर खूप दान वगैरे करतो. ‘बरोऽऽऽ पैसो केलो दिसता! खूऽऽऽप खातालो दिसता’ वगैरे वगैरे.

तेव्हा तसे काही नाही. मी तुमच्यासारखाच एक सर्वसाधारण माणूस आहे. मी आणि माझ्या बायकोने असे ठरवले आहे की आम्हाला चार मुले आहेत. पाचवे–दानधर्म. शिल्लक कमाईचे ५ वाटे करायचे. ४ मुले आणि ५वा दानधर्म. मी काही property विकणार आहे त्यात मला अडीच कोटीचा नफा अपेक्षित आहे. त्याच्या २०% म्हणजे ५० लाख Charity पैकी २० लाख तरी आपल्या संघाला मिळू शिकतील. हाच आमचा २०१९ मधील संकल्प! आता हे २० लाख रुपये कसे व कुठे खर्च करावयाचे याची माझ्या मनांत एक योजना आहे व ती तुम्हाला कळणे आवश्यक आहे.

**५) पूर्णानंद, वाळकेश्वर, समोरील १८६१ चौ. मीटरचा आपल्या मठाच्या मालकीचा प्लॉट :**

तुम्हाला माहितच असेल की आपल्या वाळकेश्वर मठाशेजारीच 'पूर्णानंद' नावाची एक टोलेजंग इमारत आहे व तेथे सर्व आपलेच ज्ञातिबांधव राहतात. या पूर्णानंद समोर एक प्रशस्त १८६१ चौ. मीटरचा, मठाच्या मालकीचा प्लॉट आहे व तो पूर्णपणे unauthorised लोकांच्या ताब्यात आहे. हा प्लॉट मठाच्या कमिटीने १९९२ मध्ये २.१४ कोटी रुपयाला विकायला काढला होता. मला वाळकेश्वर मठाचे पुजारी श्री. शांताराम भटजींचा फोन आला व त्यांनी मला ही बातमी सांगितली. माझे रोजचे ऑफीसचे काम बिल्डरलोकांबरोबरच असल्याने मला प्लॉटच्या किंमतीची चांगलीच कल्पना होती व त्या प्लॉटची त्यावेळची योग्य किंमत रु. १४ कोटीची ऑफर देणाऱ्या बिल्डरला घेऊन मी स्वामीजींना भेटलो. स्वामीजी अशी दणदणीत ऑफर बघून खूप खुश झाले आणि म्हणाले की – त्यांची एक विनंती आहे. १४ कोटीवर Security Deposit १०% म्हणजेच १.४ कोटी रक्कम मी आणलेल्या बिल्डरला, मठ–कमिटीकडे जमा करावी लागेल. ती कृपया २ कोटी करता येईल का ? स्वामीजी पुढे म्हणाले– 'आमचे बरेच मठ भारतात आहेत व त्यांची दुरुस्ती करणे अनिवार्य आहे. त्याला जवळजवळ रु. २ कोटी खर्च अपेक्षित आहे. जर १.४ बद्दल २.० कोटी रुपये डिपॉझिट दिल्यास सर्व काम वेळेत पूर्ण होईल. माझ्या माणसाने ताबडतोब २ कोटी रुपये Security Deposit देण्यास मान्यता दिली. नंतर जेव्हा मी कमिटी मेंबर्सना भेटलो तेव्हां मला वाटले होते की अशी जवळजवळ ७ पट प्रचंड ऑफर बघून ते मला डोक्यावर घेऊन नाचतील. त्यावेळी माझे शारीरीक वजनही कमी होते! पण माझी खूपच निराशा झाली. एवढी मोठी ऑफर मिळाल्याबद्दल खूश होणे तर दूरच राहीले. सर्वजण माझ्याकडे मी कोणी त्यांचा शत्रू असल्यासारखे पहात होते. शेवटी मला चॅरिटी कमिशनरकडे तक्रार केल्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता. मी चॅरिटी कमिशनरना सांगितले की कमिटीने फक्त मराठी पेपर 'नवशक्ती' मध्ये जाहिरात दिली होती आणि हा सगळा घोळ केला होता. कवळें मठ ट्रस्टचे सेक्रेटरी श्री. हरीष कुलकर्णी हे माझी ऑफर बोगस म्हणूनच प्रचार करायला लागले. मी त्यांना त्याबद्दल विचारणा केली असता ते म्हणाले ही १४ कोटी रुपयाची ऑफर देणाऱ्या कंपनीचा पत्ता C/O दिलेला आहे. एवढी मोठी ऑफर देणाऱ्या कंपनीचे स्वत:चे ऑफीसही नाही म्हणून बोगस. मी त्यांना समजाविले हे मोठे बिल्डर जेव्हा, त्यांचे समजा १० वेगवेगळ्या ठिकाणी प्रोजेक्टस् असतात, तेव्हा ते प्रत्येक साईट, इन्कमटॅक्सच्या दृष्टीने वेगवेगळ्या नावाने रजिस्टर करतात. एक साईट मुलाच्या नावावर, एक मुलीच्या नावावर, एक बायकोच्या नावावर, एक भावाच्या नावावर

वगैरे वगैरे. पण C/O दिलेला पत्ता त्यांच्या मेनयुनिटचाच असतो. पण मला एक गोष्ट समजत नाही जेव्हा माझा बिल्डर २ कोटी रुपये केवळ सिक्युरिटी डिपॉझिट म्हणून देण्यास तयार आहे तेव्हा ते आधी घ्या. म्हणजे हा बोगस का खरा हा प्रश्न उद्‌भवतच नाही. पण त्याने ते काही ऐकले नाही. तेव्हा मी परत चॅरिटी कमिशनकडे तक्रार केली आणि रिट पिटीशन फाईल केले व हा रु. २.१४ कोटीचा सौदा बारगळला गेला. त्यानंतर बऱ्याच डेव्हलपमेंटस् झाल्या, त्या मी इथे बोलत नाही. फक्त एकच सत्य परिस्थिती नमूद करणे आवश्यक वाटते की, त्यावेळच्या मठाच्या कमिटीने आणि त्या नंतरच्या कमिटीनेही या सगळ्या मोहिमेची अक्षरश: विल्हेवाट लावली कारण निव्वळ उदासीनता आणि पूर्णपणे दुर्लक्ष्य! चॅरिटी कमिशनरने, कोर्टाने वगैरे तीन–तीन वेळा बोलावून सुद्धा कमिटीचा कोणीही सदस्य मिटींगलाही गेला नाही. तेव्हा ही जमीन मठाच्या हातून जवळजवळ पूर्णपणे गेल्यातच जमा आहे.

आज २०१८ मध्ये त्या जमिनीची किंमत, कमीत कमी, रुपये शंभर कोटी तरी आहे. ज्यांनी जमीन ताब्यात घेतली आहे, त्यांनी ती सोडण्यासाठी काही रक्कम, कोर्टाचा जबरदस्त खर्च वगैरे सर्व जरी काढला तरी भरपूर रक्कम शिल्लक राहील. समोरच्या पार्टीचे वकील प्रख्यात कायदेपंडित श्री. तुळजापूरकर आहेत तेव्हा आपला वकील सुद्धा त्या तोडीचा पाहिजे व असा वकील माझ्या दोस्त लोकांपैकी आहे. तो आपली केस लढवू शकतो. मला माझ्या आई शांतादुर्गेवर पूर्ण विश्वास आहे व खात्री आहे की जरी ५% यशाची शक्यता असली तरी आपल्या सर्वांची आई आपल्याला यश मिळवून देईल. मी कोर्टाचा, वकिलाचा वगैरे २० लाखापर्यंत खर्च स्वत: करायला तयार आहे पण माझी एक अट आहे आणि ती म्हणजे मठ–कमिटी केस लढविण्याचे संपूर्ण अधिकार NKGSB संघाला देईल. केसचा संपूर्ण खर्च संघच करेल. पण जो फायदा होईल, भले १० वर्षानंतर, तो मठ व संघ यांच्यामध्ये ६०:४० असा वाटून देण्यात येईल. खरे तर आपला मठ आपल्या संघापेक्षा मला आणि आपल्या सर्व ज्ञातिबांधवांना सर्वतोपरी श्रेष्ठ आणि जवळचा आहे यात अजिबात शंका नाही. परंतु माझा मठाच्या कमिटी बरोबरचा मागचा अनुभव, कमिटीची केसबाबत अपरिपक्वता आणि कमालीची उदासीनता तसेच केसकडे संपूर्ण दुर्लक्ष्य लक्षात घेऊनच मी हा निर्णय घेतला आहे.

माझी फक्त आई शांतादुर्गेकडे एवढीच प्रार्थना आहे की, तिचे आशीर्वाद, माझे प्रयत्न, तसेच कोर्टकचेरीवर २० लाख रुपये खर्च केल्यामुळे जर यश मिळून माझ्या ज्ञातिबांधवांचे जर कल्याण झाले तर मी स्वत:ला धन्य समजेन.

**अरुण भास्कर कसबेकर**
**९८२०२९१३६५ / ८७७९९८६६०६**
arunkasby@gmail.com

# MANGSIDESH INVESTMENTS PVT LTD

402, Business Point, Paliram Road, Off S.V.Road, Behind Brahma Kumari Hospital,
Andheri (West), Mumbai 400 058
Tel No. 022-4233 2323/ 6584 1233/ 6523 8964/ 98337 22444




Can we help you to achieve your goal???

& your goal is....

Let's reach nearer

To your highest GOAL!!!

Step by step....




*A little every month grows to something significant over time!!!*

*Invest Rs.1000/- Per month & get...*

| Investment Years | Total Investment | Growth Rate 8% | Growth Rate 12% | Growth Rate 15% |
|---|---|---|---|---|
| 15 | 180,000 | 348,000 | 504,000 | 676,000 |
| 20 | 240,000 | 593,000 | 999,000 | 1,516,000 |
| 23 | 276,000 | 794,000 | 1,473,000 | 2,417,000 |
| 25 | 300,000 | 957,000 | 1,898,000 | 3,284,000 |
| 30 | 360,000 | 1,500,000 | 3,530,000 | 7,010,000 |
| 32 | 384,000 | 1,786,000 | 4,509,000 | 9,473,000 |
| 35 | 420,000 | 2,309,000 | 6,495,000 | 14,860,000 |




***Indian Equity market has given avege 16% return s in last 32 year s...***

Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully before investing.

# प्रमुख पाहुण्यांचे भाषण - प्रतिक्रिया

## (१)

२५ नोव्हेंबर २०१८ च्या आपल्या ज्ञातीच्या वार्षिक स्नेहसंमेलनात आपल्याला श्री. अरुण कसबेकर प्रमुख पाहुणे म्हणून लाभले. यापूर्वी त्यांचा स्पष्टवक्तेपणा, भन्नाट लेखन व त्यास सुस्पष्ट आधुनिक विचारांची जोड हे मुख्यपत्रिकेच्या अनेक अंकातून ते आपल्याला परिचित आहेत. त्यामुळे त्यांच्या भाषणाचीही उत्सुकता अनेकाना होती.

त्यानी कवळें येथील श्री. शांतादुर्गेच्या देवस्थानात ज्या खटकणाऱ्या प्रथा आहेत. त्या अगदी विस्तारपूर्वक व सोदाहरण मांडल्या. एक म्हणजे परदेशी जाऊन आले की यजमानाना 'प्रायश्चित' नावाचा विधी करावा लागतो. दुसरा म्हणजे एखाद्याने प्रेमविवाह केला तर दुसऱ्या जातीतील स्त्री जरी विवाह करुन आपल्या ज्ञातीत प्रवेश करती झाली तरी तिला देवळाच्या गाभाऱ्यात प्रवेश दिला जात नाही. तिसरे म्हणजे लहान मुलांना 'शिवलेले' सोवळे चालत नाही.

ह्या सर्व बाबी ऐकून लोक विचारप्रवृत्त झाले. ह्या प्रथा क्लेशदायक असल्या तरी आपण इतकी वर्षे ते सहनच करत आलो आहोत. कारण देवस्थानचे नियम, अटी हे सर्व स्वामी व देवस्थानची कार्यकारिणी ठरवत आली आहे. तेव्हा या तक्रारीचे निवारण त्या कार्यकारणीचे व तिन्ही मठांच्या स्वामींनी ठरवणे उचित होय. प्रमुख पाहण्यांचे विचार अगदी योग्य असलेतरी ते अमलांत येण्यासाठी बराच काळ जावा लागेल.

**मृदुला भांडारकर, गिरगांव**

## (२)

ज्ञातीच्या वार्षिक स्नेहसंमेलनात आपले प्रमुख पाहुणे श्री. अरुण कसबेकर यांनी आपल्या भाषणात कवळें येथील श्री. शांतादुर्गा देवस्थानातील पुजारी, तेथील प्रथा या बद्दल भाष्य केले व आपले सन्माननीय सभासद डॉ. सुहास वाघ यांनीही आपल्या जुन्या आठवणीना उजाळा दिला.

आपल्या सर्व ज्ञातीतील लोकांना आपले कुलदैवत श्री. मंगेश, श्री. शांतादुर्गा, श्री. महालक्ष्मी व इतर देवांबद्दल मनात अपार श्रद्धा आहे. आपले माजी सन्माननीय राष्ट्रपती अे. पी. जे. कलाम यांच्या 'उन्नयन' या पुस्तकात (मुळ इंग्रजी पुस्तक Transcendence My Spiritual Experiences याचा अनुवाद) त्यांनी लिओ टॉलस्टॉय यांची कविता उद्धृत केली आहे.

"श्रद्धा असते, तेथे प्रेम असते
प्रेम असते तेथे शांतता असते
शांतता असते तेथे ईश्वर असतो
आणि जिथे ईश्वर असतो, तेथे कसलीच गरज नसते."

असे जर आहे तर ईश्वरा प्रती पोचायला आपल्याला माध्यमांची गरज का बरं भासते? अलीकडे १-२ वर्षात आपल्या कानांवर श्री. मंगेश व श्री. शांतादुर्गा येथे घडणारे अनेक अनुचित प्रसंग आले. यापूर्वीही असे प्रकार घडत नव्हते असं नाही, पण श्री. अरुण कसबेकर, महिमा धुमें या सारख्यानी या घटनानां वाचा फोडायचे धाडस दाखवले.

आपले राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी आपल्या सुविचारात म्हटले आहे. Bitter Experience has taught me that all temples are not houses of God. They can be habitations of the devil. These places of worship have no value unless the keeper is a good man of God. Temples, Mosques, Churches are what man makes them to be. जुन्या अनिष्ट प्रथांना मोडीत काढायचे धाडस कोणीतरी दाखवावेच लागते आणि त्यासाठी मी श्री. अरुण कसबेकर यांचे मनापासून अभिनंदन करते.

**मंजिरी मनोज कुलकर्णी, ठाणे**

## विवाह /वाङ्‌निश्चय

| | | |
|---|---|---|
| जाह्नवी नागेश आरस, बंगळूर | व | श्रेयस सुधीर पै, पुणे |
| वसंत (चैतन्य) रमेश देसाई, बोरीवली | व | नुपूर मराठे, पुणे |
| राधिका सुनील गायतोंडे, शिवजीपार्क | व | आधिराज अनिल नेरुरकर, मुंबई |
| पुनीत प्रशांत इस्लूर, शिमोगा | व | रम्या बाबू नायक, शिमोगा |
| अदीती रमेश कसबेकर, जोगेश्वरी | व | सौरभ नितीन कामत, मुंबई सेंट्रल |
| सोफी गिरीश नाडकर्णी, अमेरिका | व | व्हिन्सेंट लिंकन मार्शल, अमेरिका |

**SHREE HOMOEOPATHIC PHARMACY**
**Wholesale & Retail For :**
**Genuine Indian & Imported Homoeopathic Medicines**
Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane,
Matunga (West), Mumbai - 400 016. Tel. : 2438 3092 / 2430 9035 Mob. : 98694 83433
Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) , Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**

# ज्ञातीचे वार्षिक स्नेहसंमेलन

दरवर्षी भरणारे आपल्या ज्ञातीचे स्नेहसंमेलन यंदा २५ नोव्हेंबर १८ रोजी दादर येथील सेंट अँटोनिओ डिसिल्वा हायस्कुलच्या सभागृहात उत्साहात पार पडले. कार्यक्रमाची सुरवात श्रीमती प्रज्ञा वागळे यांनी गणेशस्तवनाने केली. त्यानंतर प्रमुख पाहुणे श्री. अरुण कसबेकर यांनी कुलदेवतांस पुष्पहार घातला व संघाच्या आणि सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांसह दीपप्रज्वलन केले. मुख्य कार्यक्रम सुरु होण्यापूर्वी संघ, सोसायटी, ठाणे मंच व मुंबई मंच यांच्या कार्यकारिणींच्या सभासदांची उपस्थिताना ओळख करुन देण्यात आली. त्यानंतर संघाचे अध्यक्ष श्री. मारुती दळवी व एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री. देवदास नाडकर्णी यांनी आपापल्या संस्थांच्या गेल्या वर्षीच्या कार्याचा आढावा घेतला.

सोसायटीचे अध्यक्ष श्री. नाडकर्णी यांनी प्रमुख पाहुणे श्री. अरुण कसबेकर यांची, ओळख करुन दिल्यावर प्रमुख पाहण्यांना संघाचे अध्यक्ष श्री. दळवी यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देण्यात आले. सौ. मंगला कसबेकर यांनी सोसायटीच्या अध्यक्षांतर्फे पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देण्यात आले व सौ. अनुश्री संझगिरी यांच्यातर्फे त्यांची ओटी भरण्यात आली.

श्री. अरुण कसबेकर हे श्री. शांतादुर्गेचे परम – भक्त आहेत तरीही त्यांनी श्री. शांतादुर्गा देवस्थान (कवळे) येथील काही अनुचित अनुभव अतिशय धीटपणे सर्वांसमोर मांडले. (त्यांच्या भाषणाचा गोषवारा याच अंकात अन्यत्र छापलेला आहे.)

२०१८ च्या सोसायटीच्या वार्षिक सभेत डॉ. सुहास वाघ यांना त्यांच्या कार्याबद्दल सन्माननीय सभासद म्हणून 'स्वीकृत' करण्यात आले होते. त्यांच्या कार्याची थोडक्यात माहिती करुन देण्यात आली व आपले प्रमुख पाहुणे श्री. कसबेकर यांच्या हस्ते डॉ. वाघ यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

डॉ. वाघ यांनी श्री. कसबेकर यांच्या भाषणाने प्रेरित होऊन मंगेशी देवस्थानातील आपले काही अनुभव कथन केले. या प्रकारांमुळे आपल्या पुढील पिढीची आपापल्या कुलदेवतांबद्दलची श्रद्धा कमी कमी होत असल्याची खंत दोघांनीही व्यक्त केली.

आपल्या ज्ञातीतील चार हुशार विद्यार्थ्यांचा विशेष नैपुण्याबद्दल सत्कार करण्यात आला. त्यांची नावे पुढीलप्रमाणे १)आर्या मोहन सबनीस (होमी भाभा–सिल्वर मेडल) २) श्रेया सुधीर वागळे (M.S. Computer Science California) ३) डॉ. किशोर शिवानंद बोरकर (PhD in Alternative Medicines) ४) डॉ. सिद्धेश आर नाडकर्णी (PhD in Agriculture). प्रमुख पाहुणे श्री. कसबेकर यांच्या हस्ते त्यांना पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यानंतर ठाणे मंच व मुंबई मंचच्या पुढील कार्यक्रमाच्या घोषणा करण्यात आल्या.

मध्यंतरानंतर नेहमीच्या प्रथेप्रमाणे विवाहाची सुवर्ण–जयंती गाठणाऱ्या जोडप्यांचा सत्कार पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. सौ. मंगलाताईनी सर्व सुवासिनींची ओटी भरली. आपले नाशिकचे प्रसिद्ध साहित्यिक डॉ. अ. वा. वर्टी यांच्या स्नुषा सौ. वैशाली वामन वर्टी यांनी या प्रसंगाला अनुसरुन एक छान कविता सादर केली. (या अंकात ती उद्‌धृत केली आहे.) त्यानंतर वयाची ७५ वर्षे ओलांडणाऱ्या जेष्ठ नागरिकांचा स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

आपली छोटी गोड स्वयंसेविका कु. ऋतुजा मंगेश धुमें व पारंपरिक नऊवारी शालू नेसून सुवासिनींची ओटी भरण्यास साहाय्य केल्याबद्दल आपल्या उच्चशिक्षित सौ. अनुश्री देवदत्त संझगिरी, या दोघींचे सौ. मंगलताई यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन कौतुक करण्यात आले.

सर्वात शेवटी एज्युकेशन सोसायटीतर्फे अनेक स्पर्धातील विजेत्यांना तसेच गेल्या वर्षात विविध परीक्षेत प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना सौ. मंगलाताई यांच्या हस्ते परितोषिके प्रदान करण्यात आली.

त्यानंतर आभार प्रदर्शन झाले.


सर्व कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची जबाबदारी प्राची देसाई, मंजिरी कुलकर्णी, राजेश दिवेकर, राजीव गायतोंडे व गीता संझगिरी यांनी यशस्वीपणे पार पाडली.

पडद्यामागे नेहमीप्रमाणे श्रीमती मृदुला भांडारकर यांनी या कार्यक्रमासाठी अपार कष्ट घेतले.

राष्ट्रगीताने या हृद्य कार्यक्रमाची सांगता झाली.

**मंजिरी मनोज कुलकर्णी, ठाणे**

## ठाणे मंचतर्फे एक दिवसाची सहल



**दिनांक : रविवार २० जानेवारी २०१९**
**प्रस्थान : माहीम, मुलुंड, ठाणे**
**आकार : रु. ७०० (आपल्या बँकेच्या नौपाडा शाखा, खाते १८१६ मध्ये भरण्याची सोय.)**
**स्थळ : सीगल गार्डन रिसोर्ट, वज्रेश्वरी रोड.**

सुरेश पालेकर
९९६९४५५३७०

राजेश दिवेकर
९६१९३६२४३६०

# ठाणे मंच आयोजित 'सुरभी' विविध गाण्यांची धुंद मैफल

आपल्या ज्ञातीतील कलाकारांसाठी गाण्याची एक धुंद मैफील आयोजित करण्याचे ठाणे मंचने ठरविले. मुखपत्रिकेद्वारे तरुण कलाकारांना आवाहन करण्यात आले. त्यास उत्तम प्रतिसाद मिळाला आणि मग सहयोग मंदीर ठाणे येथे पहिली मैफील शनिवार १ डिसेंबर २०१८ रोजी संध्याकाळी संपन्न झाली.

श्रीमती लता नायर यांनी सर्व रसिक प्रेक्षकांचे स्वागत केले आणि या कार्यक्रमाचे उद्दिष्ट सांगितले. त्यानंतर त्यांनी १३ जानेवारी २०१९ रोजी पुण्यात आयोजित केलेल्या 'सुरभी' कार्यक्रमाची माहिती दिली. ठाणे मंचचे ज्येष्ठ सभासद श्री. दुर्गादास रेगे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन व्यासपीठावर बसलेल्या कलाकारांचे स्वागत करण्यात आले.

जसे कोणत्याही गोष्टीची सुरुवात ही देवाच्या आशीर्वादाने वा त्याच्यावरील स्तुतीसुमनानी करतो तसे आपल्या या मैफीलीची ही सुरुवात गौरांग तेलंग याने "या कुन्देन्दुतुषारहार धवला" या सरस्वती स्तवनाने केली. त्यानंतर गौरांग याने देशभक्तीपर गीत सादर केले. या कार्यक्रमात आपण निवडक गीतकार संगीतकारांच्या गाण्याचा आनंदानुभव घेतला. गौरांग याने कवीवर्य ग्रेस यांची कविता नटलेली "भय इथे संपत नाही" हे गाणे सादर केले. संदीप खरे, सलील कुलकर्णी, यशवंत देव, पं. जीतेन्द्र अभिषेकी यांची गाणी गौरांगने गाऊन रसिकांना मंत्रमुग्ध करुन त्यांची वाहवा मिळविली त्यानंतर हिंदी गाण्याची मेलडी पण पेश केली. या कार्यक्रमाला आणखी उंचीवर नेऊन ठेवले ते सलोनी बोरकर हिच्या गाण्याने, सुधीर फडके यांनी स्वरबध्द केलेले "का रे दुरावा", अशोक पत्की यांनी स्वरबद्ध केलेले, "नाविका रे" व शांता शेळके यांची लावणी "रेशमाच्या रेघांनी" ही गाणी तिने सादर केली. उत्तरोत्तर मैफिलीचा रंग या तरुण कलाकारांनी खुलवतच ठेवला होता. मीनल वागळे तेंडुलकर हिच्या गाण्यानी त्यात अजून रंग भरले गेले. सुधीर फडके यांनी स्वरबध्द केलेली "माझा होशील का" सुरेश भट यांच्या लेखणीतून उमटलेली गजल "केव्हा तरी पहाटे", शांता शेळके यांच्या लेखणीतून उतरलेली "जया शारदे वाशीश्वरी" व पी सावळाराम यांनी शब्दबध्द केलेली व वसंत प्रभू यांनी स्वरबध्द केलेली "हृदयी जागा तू अनुराधा" ही गाणी गाऊन रसिकांची दाद घेऊन गेले.

मध्यन्तरात चहापानाचा आस्वाद घेऊन रसिक पुन्हा आसनस्थ झाले. प्रज्ञा वागळे यांनी सलील चौधरी यांनी स्वरबध्द केलेले "ना जिया लागेना" हे वसंत प्रभू यांनी स्वरबध्द केलेले गाणे गाऊन रसिकांनी त्यांना टाळ्यांच्या माध्यमातून आपली दाद दिली.

या सर्व कला आपण आपल्या गुरुंकडून शिकतो त्या गुरुंचे स्मरण ठेवून गौरांगने गायलेले "गुरु परमात्मा परेशु" श्रोत्यांकडून Once more मिळवून खऱ्या अर्थाने गुरुची

महती गाऊन गेली.

कोणतेही संगीत अथवा गाणे हे वाद्याच्या साथीविना अधुरे वाटते अशा या उत्कृष्ट गायलेल्या गाण्यांना तितक्याच ताकदीने स्वरसाथ देणारे व तालबध्द करणारे कलाकारही तेवढेच महत्त्वाचे. त्यांना साथ देणारे होर्मोनियम वादक श्री. मंदार गानु व तबलावादक श्री. आशिष पवार यांनी श्रोत्यांची मने जिंकली. सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणाऱ्या निवेदिका श्रीमती वंदना तेलंग यांनी त्याच्या खुसखुर्शीत शैलीत निवेदन केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. राजेश दिवेकर, श्री. अरुण वाघ, श्री. दुर्गादास रेगे यांनी मेहनत घेतली आणि अत्यंत महत्त्वाचे आभार प्रदर्शन मानायचे तर सर्व चोखंदळ रसिक श्रोत्यांना ज्यांनी जोरदार टाळ्यांनी सर्व कलाकारांना पसंतीची पावती दिली..

शेवटी श्री. सुरेश पालेकर यांनी आभार प्रदर्शन करुन कार्यक्रमाची संगता केली.

**सुषमा सुबोध मुळगावकर**
**९८१९८३६४७६**

## निधन

| | | |
|---|---|---|
| सुरेश नीलकंट भट (पावशे) | (बाड) | बाड |
| निर्मला (इंदू) भवानीशंकर कसबेकर | (कडवाड) | विरार |
| उमाबाई भवनीशंकर (पुतु) कसबेकर | (कडवाड) | सदाशिवगड |
| मनीषा मनोहर कुलकर्णी (पूर्वाश्रमीच्या कुमुद मंगेश मुझुमदार) | (अंकोला) | बंगळूर |
| गजानन भिकोबा मिटबंदर | (अंकोला) | ठाणे |
| विनया विजयानंद नाडकर्णी | (हाणकोण) | मंगेशी |
| नीलकंठ (बाळ) बाबुराव नाडकर्णी | (मल्लापूर) | घाटकोपर |
| सुनीता सुरेश पालेकर | (कडवाड) | बंगळूर |
| गीता उल्हास साखरदांडे | (हळगे) | गोरेगांव |
| मंगेश यशवंत शेटगिरी | (अंकोला) | मंगेशी |
| शंकर शेषगिरी तेलंग | (केरवडी) | केरवडी |
| मुक्ता पुरुषोत्तम वाघ | (सदाशिवगड) | अंधेरी |

# ठाणे मंच आयोजित
# तिसरा वधूवर परिचय मेळावा वृत्तांत

ठाणे मंचच्या कार्यकारी मंडळाच्या सभेमध्ये नोव्हेंबर महिन्यात वधूवर परिचय मेळावा घ्यावा असे ठरवण्यात आले. मागील दोन वर्षाचा अनुभव गाठीशी होता त्यानुसार कामाची विभागणी करण्यात आली. सदर मेळावा गौड सारस्वत ब्राह्मण व सारस्वत ज्ञातीतील उमेदवारांसाठी भरवण्याचे ठरले. बॅनर्स, हँडबिल्स www://nkgsbmatrimony.com ह्या पोर्टलद्वारे तसेच संघाची मुखपत्रिका व फोनद्वारे वेळोवळी संबंधितांशी संपर्क साधण्यात आला.

रविवार दिनांक १८.११.२०१८ रोजी माहीम येथील तेंडूलकर मंगल कार्यालय येथे मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. सकाळी ९ वाजल्यापासून इच्छूक उमेदवार तसेच त्यांचे पालक येण्यास सुरवात झाली. ठाणे मंचाचे सदस्य श्री. राजेश दिवेकर व श्री. अरुण वाघ ह्यांनी नोंदणीची जबाबदारी चोखपणे पार पाडली. सौ. अनुजा नाडकर्णी व श्री. गिरीश रेगे हयांनी उमेदवारांकडून माहिती अर्ज भरुन घेतले. ठाणे मंच उपाध्यक्ष श्री. सुरेश पालेकर ह्यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करून मंच कार्यकर्त्यांची ओळख करुन दिली.

सर्वानी चविष्ट बटाटेवडा-चटणी, उपमा व चहाचा आस्वाद घेतला. १०.३० वाजता मेळाव्यास रीतसर सुरवात झाली. श्री. पालेकर यांनी मेळाव्याचे उद्दिष्ट व ठाणे मंच उपक्रमाविषयी उपस्थितांना माहिती दिली.

श्री. दिनेश नाडकर्णी ह्यांनी कार्यक्रमाचे सूत्र संचालन केले. उपस्थित उमेदवार तसेच पालक ह्यांच्याशी संवाद साधत खेळीमेळीच्या वातावरणात त्यांना बोलते केले.

प्रत्येक उमेदवाराने स्वत:ची ओळख, आपले छंद, आवड तसेच जोडीदाराकडून आपल्या काय अपेक्षा आहेत. त्याबद्दल सांगितले. जे उमेदवार अनुपस्थित होते त्यांच्या पालकांनी आपल्या मुलाविषयी माहिती दिली. सांगण्यास विशेष आनंद होतो की सदर मेळाव्यास उत्तम प्रतिसाद मिळाला. ५१ उमेदवारांनी नोंदणी केली. जवळपास शंभर जण उपस्थित होते. बदलत्या काळानुसार ज्ञातीतील विवाहेच्छुक मुलामुलींनी आपल्या वेबसाईटवर नावे रजिस्टर करुन online सिस्टीमचा जास्तीत जास्त फायदा घ्यावा असे सर्वाना आवाहन करण्यात आले.

वेबसाईट रजिस्ट्रेशन करताना येणाऱ्या अडचणीविषयी उपस्थितांच्या प्रश्नांना श्री. पालेकर व श्री. गिरीश रेगे ह्यांनी उत्तरे दिली. प्रातिनिधीक स्वरुपात मुलामुलीनी तसेच काही पालकांनी आपली मते मांडली. प्रत्यक्ष भेटीसाठी व्यासपीठ उपलब्ध करुन दिल्याबद्दल तसेच मेळाव्याचे उत्तम आयोजन केल्याबद्दल ठाणे मंचाची प्रशंसा केली व असे मेळावे नेहमी भरवण्यात यावे अशी इच्छा अनेकानी व्यक्त केली.

सरतेशेवटी रुचकर भोजनाचा आस्वाद घेऊन सदर कार्यक्रमाची सांगता झाली.

**गिरीश रेगे**
९९२२१६८७२५

# विवाहाची सुवर्ण जयंती ५० वर्षांचा सहवास

**सौ. वैशाली वर्टी, नाशिक**

विवाहाच्या सुवर्णजयंतीच्या सत्काराचं आमंत्रण आलं आम्हाला जेव्हा
आम्हा दोघानाही खूपच आनंद झाला तेव्हा।
त्यानंतर खूप विचार मनात येऊ लागले
आणि त्या आठवणीतच मी बुडुन गेले।
खरंच माहेर सोडून आपण मुली सासरी जातो
आणि तिथल्याच वातावरणात छान समरसही होतो।
आई वडिलांचे संस्कार घेऊन नव्या जगात पाऊल ठेवतो
आणि सासरी सासू सासरे व इतरांचे आशीर्वाद व प्रेम मिळवितो।
सासरचे आणि माहेरचे वाढत जातात स्नेहबंध
आणि संसारात दरवळू लागतो छानसा गंध।
लग्नाची पहिली वर्षे किती मनोरथ रचतो
आणि ते पूर्ण करण्यासाठी सतत धडपड करतो.
संसारात कधी सुखाचे, दु:खाचे येणारे प्रसंग
दोघे मिळून अनुभवतो एकसंग।
आयुष्यात येणाऱ्या सर्व प्रसंगाना समोर जातो
आणि सारं जीवन पणाला लावून त्यातच आनंद मानतो।
संसाराच्या वेलीवर फुलतात आपली फुलं
त्यांच्या संगोपणातच आपण सुख मानतो आपलं।
स्वप्न पूर्ण करतां करतां आपल्या संसाराची
काळजी करतो मुलांच्या शिक्षणाची आणि नंतर त्यांच्या लग्नाची।
मुलांबाळांच्या, घरच्या जबाबदाऱ्यात कशी वर्षं जातात कळत नाही
आणि एकदम आजी–आजोबा झाल्याचं लक्षातही येत नाही।
हल्ली नाही म्हटलं तरी दोघात वादविवाद, तू तू मै मै ही करतो
मात्र त्याबरोबरच एकमेकांच्या आवडी निवडी पण जपतो।
दोघांच्या साथीने सहविचाराने बघता बघता ५० वर्षे झाली
आणि जणू आपल्या संसाराला सुंदर सोनेरी किनार लागली।
माझ्या इतर सर्व सहकारी सत्कारार्थींना लाभो असेच
आनंद व निरोगी आयुष्य हीच मनापासून इच्छा
त्यासाठी मी सर्वांना देते खूप खूप शुभेच्छा!

(टीप : ज्ञातीच्या गेल्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या प्रसंगी विवाहाचा सुवर्णमहोत्सव गाठणाऱ्या जोडप्यांचा सत्कार करण्यांत आला होता. त्याप्रसंगी नाशिकचे सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. अ. वा. वर्टी यांचे सुपुत्र श्री. वामन वर्टी व त्यांच्या पत्नी सौ वैशाली हे जोडपे आवर्जून उपस्थित होते. उभयतांचा सत्कार झाल्यावर सौ. वर्टी यांनी प्रसंगाला अनुरुप सादर केलेली ही कविता.)

# संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

**(मागील अंकानंतर)**

**उल्लेखनीय देणग्या**

## श्रामती मीरा वागळे यांच्या इच्छेनुसार दोन लाख रुपयांची देणगी

नवी मुंबई येथे राहणाऱ्या श्रीमती मीरा गणपत वागळे, पूर्वाश्रमीच्या मीरा दत्तात्रय कसबेकर, यांचे १२ ऑक्टोबर २०१८ रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आलेख प्रशंसनीय होता. १९४५ साली कारवारच्या सुप्रसिध्द हिंदू हायस्कूलमधून त्या मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाल्या. तेव्हा संपूर्ण मुंबई इलाख्यांतून मुलीमध्यें त्या सर्वप्रथम आल्या होत्या व त्यांना प्रतिष्ठित समजणारे चॅटफील्ड पारितोषिक मिळाले होते. त्यांचे मोठे बंधू व महाराष्ट्र सरकारचे मुख्य सचीव कै. पी. डी. कसबेकर हे पण १९३८ साली हिंदू हायस्कूलमधून मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाले तेव्हा उभ्या मुंबई इलाख्यातून त्यांना प्रथम क्रमांक मिळाला होता. उभय भावाबहिणींचे यश अभिमानास्पद आहे. मीरामामींने नंतर रुईया कॉलेजमधून गणित विषयांत पदवी मिळविली. विवाह झाल्यावर व दोन मुले झाल्यावर त्यांनी एम्. ए.ची परीक्षा दिली. व त्या प्रथम वर्गांत उत्तीर्ण झाल्या. परळ येथील महर्षी दयानंद कॉलेजमध्ये त्यांनी गणित विषयाचे अध्यापन केले. ज्ञातीच्या कार्यामध्ये त्यांना विशेष रस होता. त्यांच्याच इच्छेनुसार अलीकडेच दोन लाख रुपयांची देणगी मिळाली आहे. त्यांतील एक लाख रुपये वृध्दसेवानिधीसाठी आहेत व प्रत्येकी पन्नास हजार रुपये समाजसेवानिधीसाठी व एज्युकेशन सोसायटीसाठी आहेत.

## श्रीमती मंगला वागळे यांच्या इच्छेनुसार एज्युकेशन सोसायटीला दोन लाख रुपयांची देणगी

पणजी येथील एक लोकप्रिय व ज्येष्ठ समाजसेविका श्रीमती मंगला सर्वोत्तम वागळे यांचे काही महिन्यापूर्वी २७ एप्रिल २०१८ रोजी निधन झाले. त्यांच्या कार्याची संक्षिप्त माहिती व श्रीमती मीरा प्रभूवेर्लेकर यांनी 'लोकमत' या दैनिकात लिहिलेला त्यांच्यावरचा लेख मुखपत्रिकेच्या जुलै २०१८ च्या अंकात प्रसिध्द झाला होता. मंगलाताईंच्या इच्छेनुसार आपल्या एज्युकेशन सोसायटीला दोन लाख रुपयांची देणगी मिळाली आहे. त्यांतील प्रत्येकी एक लाख रुपये पती सर्वोत्तम नारायण वागळे व पुत्र सुरेन्द्र यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ आहेत.

## पद्मभूषण डॉ. पद्माकर दुभाषी यांजकडून एक लाख रुपयांची देणगी

८८ वर्षीय पुणे येथील पद्मभूषण डॉ. पद्माकर रामचंद्र दुभाषी यांना आपला संघ व आपली एज्युकेशन सोसायटी या उभय संस्थाबद्दल विशेष आस्था आहे. १९९५ साली संघाचा हीरक महोत्सवी समांरभ झाला तेव्हा ते प्रमुख पाहुणे म्हणून आवर्जून उपस्थित होते. २००१ साली एज्युकेशन सोसायटीने त्यांना गोवा विद्यापीठाचे पांच वर्षे कुलपती म्हणून प्रशंसनीय काम केले होते. त्यानिमित्त शिक्षणक्षेत्रातील त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना सन्माननीय सभासद म्हणून स्वीकृत करुन घेतले होते. त्यांना अलीकडेच एक प्रतिष्ठित समजला जाणारा पुरस्कार

मिळाला आहे. त्याचा तपशील 'प्रकाशझोत' या सदरांत (पृ. ५) दिला आहे. त्यांनी अलीकडेच संघाला व एज्युकेशन सोसायटीला प्रत्येकी पन्नास हजार म्हणजे एकूण एक लाख रुपयांची देणगी दिली आहे.

## श्रीमती विजया वागळे यांच्या इच्छेनुसार वृध्देसेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी

तीन वर्षापूर्वी वनखात्यातील एक वरीष्ठ अधिकारी श्री. विश्वनाथ मंजुनाथ (जिवमाम) वागळे यांच्या पन्नासाव्या पुण्यतिथीप्रसंगी त्यांची कन्या श्रीमती लक्ष्मी व जामात श्री. अविनाश नाडकर्णी यांनी वृध्दसेवानिधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली होती. श्री. वागळे यांच्या पत्नी श्रीमती विजया (कुंदा) यांचे अलीकडेच ऑगस्ट २०१८ मध्ये दु:खद निधन झाले. त्यांच्याच इच्छेनुसार वृध्दसेवानिधीसाठी आणखी एक लाख रुपयांची देणगी मिळाली आहे. त्यांतील प्रत्येकी पन्नास हजार रुपये आईवडील श्रीमती दुर्गाबाई व श्री. शिवानंद बाळकृष्ण पालेकर व पती श्री विश्वनाथ वागळे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ आहेत.

## श्री. शरत् दिवेकर यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ वैद्यकीय साहाय्या प्रीत्यर्थ एक लाख रुपयांची देणगी

दादर येथे राहणारे श्री. शरत् यशवंत दिवेकर हे आपल्या ज्ञातीचे हितचिंतक होते. त्यांचे कर्तबगार वडील कै. यशवंत रुद्रा दिवेकर यांच्या जन्मशताब्दीच्या प्रसंगी १९९१ साली त्यांनी आपल्या कुटुबीयांसमवेत आपल्या एज्युकेशन सोसायअीला सव्वा सहा लाख रुपयांची देणगी दिली होती. २०१६ साली वडिलांच्या १२५ व्या वाढदिवसाप्रसंगी त्यांनी स्वत: वृध्दसेवानिधीसाठी सव्वा लाख रुपयांची भरघोस देणगी दिली होती. श्री. दिवेकर यांचे ७ नोव्हेंबर २०१७ रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पहिल्या पुण्यतिथीच्या प्रसंगी त्यांच्या पत्नी श्रीमती सुधा दिवेकर यांनी पतीच्या स्मरणार्थ वैद्यकीय साहाय्या प्रीत्यर्थ एक लाख रुपयांची देणगी दिली आहे.

## श्रीमती स्मिता व श्री. भास्कर कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ समाजसेवा निधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी

पारले पश्चिम येथे राहणारे मूळ अवर्सेचे श्री. भास्कर मंगेश कुलकर्णी यांचे अलीकडेच ६ ऑक्टोबर रोजी निधन झाले. ते वेळोवेळी संघाला देणग्या देत असत. त्यांच्या व त्यांच्या पत्नी श्रीमती स्मिता (गुलाब) यांच्या स्मरणार्थ त्यांचे मुलगे अशोक व अतुल यांनी समाजसेवानिधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.

## आईवडिलांच्या स्मृतीप्रीत्यर्थ एका हितचिंतकाकडून समाजसेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी

अंधेरी येथे राहणारे ज्ञातीचे एक हितचिंतक यांनी आपल्या आईवडिलांच्या स्मृतीप्रीत्यर्थ आपले नांव जाहीर न करण्याच्या अटीवर समाजसेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी दिली आहे.

## श्री. मंगेश बोरकर यांजकडून वृद्धसेवानिधीसाठी एक लाख एक रुपयांची देणगी

पारले (प) येथे राहणारे संघाचे एक हितचिंतक श्री. मंगेश शंकर बोरकर यांनी दिवंगत पत्नी श्रीमती अन्नपूर्णा यांच्या इच्छेनुसार 'व्हडली पंचम' मार्गशीर्ष शु. ५ या शुभदिनी आई वडील श्रीमती उमाबाई व श्री. शंकर अनंत बोरकर व सासू सासरे श्रीमती लक्ष्मीबाई व श्री. नारायण श्रीनिवास नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ वृद्धसेवानिधीसाठी एक लाख व एक रुपयांची देणगी दिली आहे.

## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | आईवडिलांच्या स्मरणार्थ मुलाकडून | १,००,००० |
| २. | अनामिकाकडून | १,००१ |
| ३. | श्रीमती स्मिता (गुलाब) व श्री. भास्कर मंगेश कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ पुत्र सर्वश्री अशोक व अतुल यांजकडून. | ५०,००० |
| ४. | श्रीमती यमुनाताई, सपाताई व सिंधूताई या बहिणींच्या स्मरणार्थ भाऊबीजेनिमित्त श्री. मंगेश शंकर बोरकर यांजकडून. | ३,००३ |
| ५. | श्री. रमाकांत भवनीराव बोरकर यांच्या २२ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या मुलांकडून. | १,००१ |
| ६. | श्री. गोविंद बाळगी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती सीमा (पूर्वाश्रमीच्या प्रमिला रामचंद्र दिवेकर) व कुटुंबीयांकडून. | १०,००० |
| ७. | श्रीमती प्रमिला व श्री. रत्नाकर दत्तात्रय देसाई यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. दिनेश यांजकडून. | १०,००१ |
| ८. | श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती सुधा यांजकडून. | १,००१ |
| ९. | स्नेहसंमेलनाच्या प्रसंगी पद्मभूषण डॉ. पद्माकर रामचंद्र दुभाषी यांजकडून | ५०,००० |
| १०. | विवाहाच्या सुवर्ण जयंती प्रसंगी श्रीमती वैशाली व श्री. वामन अनंत वर्टी यांजकडून. | ११,००० |
| ११. | श्रीमती मीरा गणपत वागळे यांच्या इच्छेनुसार. | ५०,००० |

## वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शरत् यशवंत दिवेकर यांच्या १ल्या पुण्यतिथीनिमित्त पत्नी श्रीमती सुधा यांजकडून. | १,००,००० |
| २. | श्री. गजानन सीताराम बोरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त पत्नी श्रीमती विमल यांजकडून. | ५,००० |


| | | |
|---|---|---|
| ३. | श्रीमती अनुप्रिता माधव गांगोडकर यांच्या स्मरणार्थ पती श्री. माधव दामोदर गांगोडकर यांच्याकडून त्यांच्या ८० व्या वाढदिवसाच्या प्रसंगी. | २५,००० |

## वृध्दसेवानिधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | आईवडील श्रीमती दुर्गाबाई व श्री. शिवानंद बाळकृष्ण पालेकर यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती विजया विश्वनाथ वागळे यांच्या इच्छेनुसार. | ५०,००० |
| २. | श्री. विश्वनाथ मंजुनाथ वागळे यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती विजया विश्वनाथ वागळे यांच्या इच्छेनुसार | ५०,००० |
| ३. | श्रीमती मीरा गणपत वागळे यांच्या इच्छेनुसार. | १,००,००० |
| ४. | श्री. विश्वंभर त्रिंबक कसबेकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. देवीदास यांजकडून. | ११,००० |
| ५. | श्री. मंगेश शंकर बोरकर यांजकडून दिवंगत पत्नी श्रीमती अन्नपूर्णा यांच्या इच्छेनुसार आईवडील श्रीमती उमाबाई व श्री. शंकर अनंत बोरकर व सासूसासरे श्रीमती लक्ष्मीबाई व श्री. नारायण श्रीनिवास नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ. | १,००,००१ |

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्री सर्वोत्तम नारायण वागळे यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती मंगला यांच्या इच्छेनुसार. | १,००,००० |
| २. | श्री सुरेंद्र सर्वोत्तम वागळे यांच्या स्मरणार्थ आई श्रीमती मंगला यांच्या इच्छेनुसार. | १,००,००० |
| ३. | श्री. रमाकांत भवानीराव बोरकर यांच्या २२ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या मुलांकडून. | १,००१ |
| ४. | श्री. विठ्ठल गोविंद बोरकर यांच्या स्मरणार्थ पुतण्या श्री. मिलींद दिनकर बोरकर यांजकडून. | १,००१ |
| ५. | श्रीमती मीरा गणपत वागळे यांच्या इच्छेनुसार. | ५०,००० |
| ६. | श्री. दिनानाथ मधुकर वाघ यांजकडून. | ५,००१ |
| ७. | श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती सुधा यांजकडून | १,००१ |
| ८. | ७५ व्या वाढदिवसानिमित्त श्री. वामन अनंत वर्टी यांजकडून. | ११,००० |



www.kccgoa.in
कोमल हिरवी तृणपाती ही
अलगद झुलवी सर्वांग,
कोवळ्या सुवर्ण प्रकाशात
उजळून जाई आनंद
अप्रतिम निसर्गाने नटलेलं
सुखसमृद्धी
मंगेशाच्या देवळापासून 2 मिनिटांच्या अंतरावर,
मंगेशी, फोंडा- गोवा
मनाला भुरळ घालणारं गोव्याचं आल्हाददायक सृष्टीसौंदर्य, प्रदूषणविरहीत हवा, खळाळणारं पाणी आणि सोबत मंगेश, म्हाळसा, नृसिंह, नवदुर्गा अशा देव-देवतांच्या सान्निध्याने पवित्र झालेला परिसर याने नटलेला आमचा नवा प्रकल्प 'सुखसमृद्धी' म्हणजे नावाला साजेसं असं सुख, समृद्धी आणि मांगल्याचं वरदान ठरेल हे नक्कीच. निसर्गाच्या सान्निध्यात राहून मनःशांति मिळविण्यासाठी आजच आमच्याशी संपर्क साधा.
फ्लॅटस् उपलब्ध: 1 रुम किचन, 1 बी.एच्.के, 2 बी.एच्.के
प्रॉजेक्ट मान्यता: गोवा टाउन प्लॅनिंग
कर्जसहाय्य: नामवंत वित्त संस्था
a Project by:
कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी
मुंबई ऑफिस: श्री. उमेश केरकर, 401, चौथा मजला, व्योम आर्केड, युनायटेड इंक कंपनीच्या बाजूला,
सुभाष रोड, विलेपार्ले (पू), मुंबई- 400057. टेलि: 2683 3841/47/ 72. मोबा: 98336 36451
फॅक्स: 2683 3872 ई-मेल: kunalconstructiongoa@yahoo.in GOA RERA NO: PRGO05180314
गोवा ऑफिस: टी- 1, रॉयल हाऊस, काझीवाडो, फोंडा- गोवा. मोबा: 98209 33352, 98206 33321
गोवा साईट: 95/1, वेलिंग, मंगेशी, म्हार्दोळ, फोंडा- गोवा

NKGSB Bank
NKGSB Co-op. Bank Ltd.
(Multi-State Scheduled Bank)
SINCE 1917
100 YEARS of Banking Excellence 1917-2017

# Better Rate...Higher Returns

1 Year - upto 2 Years

QIRP

REGULAR 7.50%

SENIOR CITIZEN 7.75%

FDR/MIP/RD

8% FOR ALL

w.e.f.22.05.2018



## Our Savings Account is much more than just savings

**Super Savings**
- Average Monthly Balance of ₹25,000
- Personal Accident Cover up to ₹1 Lac for 1 year
- 25% Waiver in Processing Fees on all Retail Loans
- Demat - Free AMC for One Year

**Normal Savings Account**
- Minimum Balance: ₹500 (without cheque book) ₹1000 (with cheque book)

**Super Esteem Savings**
- Average Monthly Balance of ₹50,000
- Personal Accident Cover up to ₹2 Lac for 2 Years
- 50% Waiver in Processing Fees on all Retail Loans
- Demat - Free AMC for Two Years

**Super Exclusive Savings**
- Average Monthly Balance of ₹1 Lac
- Personal Accident Cover up to ₹3 Lac for 3 Years
- No Processing Fees on all Retail Loans
- Demat - Free AMC for Three Years

24/7 Call us: 022 2860 2000 | Email: customercare@nkgsb-bank.com | www.nkgsb-bank.com

हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी
दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.